RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १०, अंक १२५ ] सोमवार, सप्टेंबर ९, २०२४/भाद्रपद १८, शके १९४६ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ३३६

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

## जलसंपदा विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ सप्टेंबर २०२४.

### अधिसूचना

**महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५.**

क्र. मजनिप्रा २०२३/(६६/२३)/जसं (आस्था).— ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ (२००५ चा महा. अठरा) च्या कलम ३ पोट-कलम (१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक १२ ऑगस्ट २००५ रोजी शासन अधिसूचना क्र. मजनिप्रा निवड २००५/(७८/२००५) द्वारे महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची स्थापना केली आहे;

आणि ज्याअर्थी, श्रीम. श्वेताली अभिजीत ठाकरे, यांची अर्थशास्त्र क्षेत्रातील तज्ञ म्हणून दिनांक १८ मे २०२१ रोजीच्या जलसंपदा विभाग, शासन अधिसूचना क्र. मजनिप्रा. २०२०/(२७/२०२०) जसं (आस्था) द्वारे उक्त प्राधिकरणाच्या सदस्या म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, या प्राधिकरणावरील उक्त सदस्य पदाची मुदत दिनांक २ जून २०२४ रोजी संपुष्टात आली आहे आणि उक्त प्राधिकरणावर सदस्याची नियुक्ती करणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेल्या निवड समितीने तीन वर्षांच्या कालावधीसाठी, उक्त प्राधिकरणाच्या सदस्या म्हणून पुनर्नियुक्तीसाठी श्रीमती श्वेताली अभिजीत ठाकरे यांच्या नावाची शिफारस केली;